महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com

दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/

दिनांक : 01 एप्रिल, 2021

---

**वाचा** :- 1. साथरोग कायदा, 1897

2. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51
3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973
4. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर.92/DisM-1 दि. 15/03/2021
5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/314 दि. 16.03.2021
6. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर.92/DisM-1 दि. 27/03/2021
7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/373 दि. 27.03.2021
8. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/390 दि. 31.03.2021
9. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचे प्रस्ताव क्र.जिपचं/शिक्षण (माध्य.) /आस्था/722/2021 दि. 01.04.2021.

---

**: : आदेश : :**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग कायदा, 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3 व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्याबाबतची नियमावली प्रसिध्द करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावात वाढ होत असल्याने व कोरोना विषाणूने बाधित झालेल्या व्यक्तींची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने खबरदारी घेण्याच्या दृष्टीकोणातून त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व उपाययोजना राबविण्याकरिता संदर्भ क्र. 06 अन्वये आदेश निर्गमीत करुन काही बाबींस प्रतिबंध करण्यात आलेला असल्याने, या कार्यालयाचे संदर्भ क्र. 07 व 08 चे आदेशान्वये, सदर आदेशातील तरतुदी चंद्रपूर जिल्हयातील कार्यक्षेत्रात दि. 30.04.2021 पावेतो लागु करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि. 23.11.2020 पासुन मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन इयत्ता 9 ते 12 वी चे वर्ग व दि. 27.01.2021 पासुन इयत्ता 5 ते 8 चे वर्ग सुरु करण्यास परवानगी दिलेली असल्याने चंद्रपूर जिल्हयात सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शाळेतील इयत्ता 5 ते 12 वी चे वर्ग नियमीतपणे सुरु करण्यात आलेली आहेत. परंतु शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची कोरोनाग्रस्त च्या संख्येत वाढ होत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हयातील इयत्ता 5 वी ते 9 वी व इयत्ता 11 वी चे वर्ग तात्पुरते बंद करुन सुचनात्मक आदेश निर्गमीत करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडून या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

//\//

Scanned with CamScanner

आणि ज्याअर्थी, कोरोना विषाणुच्या संसर्गामुळे बाधित झालेल्या व्यक्तींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबविणे आवश्यक असल्याने आपातकालीन परिस्थीती उद्भवू नये यादृष्टीने पुर्व तयारी करणे आवश्यक झालेले आहे.

त्याअर्थी, **मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर** असे आदेशीत करतो की, चंद्रपर जिल्हयातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या **शाळेतील इयत्ता 5 वी ते 9 वी व इयत्ता 11 वी चे वर्ग तात्पुरते स्वरुपात दि. 05.04.2021 ते दि. 30.04.2021 या कालावधीकरीता बंद राहतील** तसेच खालील सुचनाचे यथोचितरित्या पालन करणे आवश्यक राहील.

- जिल्हयातील इयत्ता 1 ली ते 9 वी व इयत्ता 11 वी चे वर्ग ऑनलाईन सुरु राहील.
- कोव्हीड-19 च्या सर्व सुरक्षा विषयक नियमांचे पालन करुन इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी चे वर्ग पुर्वीप्रमाणेच सुरु राहतील.
- शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नियमित आवश्यकतेनुसार शाळेत उपस्थित राहतील.
- शिक्षक शाळेत येऊन ऑनलाईन वर्ग घेतील तसेच इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी च्या बोर्ड परीक्षेकरीता शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार काम करतील.
- राज्य शासन व जिल्हा प्रशासनाने कोव्हीड-19 च्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाची कोणतेही व्यक्ती, संस्था आणि संघटना यांनी अंमलबाजवणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता कलम 188 तसेच साथरोग कायदा 1897 अन्वये दंडनीय/कायदेशीर कार्यवाही संबंधीत पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांनी करावी. सर्व संबधित प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी उपरोक्त आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**सदरचा आदेश दिनांक 01.04.2021 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिलेला आहे.**

सही/-
(अजय गुल्हाने)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**प्रतिलीपी :- माहितीस सविनय सादर.**

1. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
   **माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.**
2. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
4. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
5. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
6. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
7. शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.) जिल्हा परिषद, चंद्रपूर
8. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
9. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
10. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**



Scanned with CamScanner